सूचना का अधिकार

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक

विधी सेवा सदन, जिल्हा न्यायालय परीसर, नाशिक.
दूरध्वनी क्र : ८५९१९०३६१५
ईमेल आयडी :- dlsa-nashik@bhc.gov.in

सचिव
सतीश बा. हिवाळे

अध्यक्ष
राहुल ना. रोकडे

जा. क्र. जि.वि.से.प्रा./१८९३/२०२६ दि. १७/०७/२०२६

जाहिरात

संदर्भ :— National Legal Services Authorities Scheme for Para-Legal Volunteers (Revised).

यान्द्वारे कळविण्यात येते की, माननीय राष्ट्रीय विधी सेवा समिती, नवी दिल्ली यांचे कडील उपरोक्त संदर्भान्वये जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक यांचेकडे वेळो वेळी विधी स्वयंसेवक **(Para-Legal Volunteers)** यांची यादी तयार केली जाते. सदर योजनेअंतर्गत विधी स्वयंसेवकांची भूमिका ही समाजातील दुर्बल, उपेक्षित, महिला, बालक, आदिवासी, कारागृहातील बंदी, असंघटीत कामगार इत्यादी घटकांपर्यंत कायदेविषयक जागृती पोहचवणे, कायदेविषयक समस्या सोडविण्यासाठी प्रारंभिक मार्गदर्शन देणे, अर्ज / याचिका / नोटीस तयार करण्यास मदत करणे, शासकीय कार्यालयांमध्ये साथ देणे, आवश्यकतेनुसार वकील/विधी सेवा संस्थेकडे संदर्भित करणे, लोकन्यायालय, मध्यस्थी, विधी सहाय केंद्र, कारागृह भेटी, बाल न्यायमंडळ, फ्रंट ऑफीस, प्रिलिटीगेशन काउन्सिलिंग, NALSA/MSLSA योजनांची अंमलबजावणी करणे इत्यादी आहे.

तरी लोकन्यायालय, मध्यवर्ती कारागृह, बाल न्यायमंडळ, फ्रंट ऑफीस, तसेच न्यायालयातील कामकाजासाठी काही होतकरु, समर्पित व कार्यक्षम विधी स्वयंसेवकांची आवश्यकता आहे. माननीय राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे सुधारीत पॅरा लिगल व्हॉलंटिअर्स योजनेच्या नुसार विधी स्वयंसेवकाची नियुक्ती करतांना खालील अनिवार्य पात्रता अटी पूर्ण करणा—या अर्जदारांचे अर्ज मागविण्यात येत आहे:

१. किमान शैक्षणिक अर्हता : दहावी उत्तीर्ण किंवा त्यापेक्ष जास्त शैक्षणिक अर्हता.

२. वय : किमान १८ वर्षे पूर्ण झालेले

३. चारित्र्य : उमेदवाराचे चारित्र्य चांगले असावे. (पोलीस ठाणे तर्फे चारित्र्य प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य)

४. राजकीय संबंध : उमेदवार कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य नसावा किंवा राजकीय पक्षाशी सक्रियपणे संबंधित नसावा (याबाबत स्वयंघोषणा / अंडरटेकिंग देणे अनिवार्य)

५. वैद्यकीय तंदुरुस्ती : उमेदवार वैद्यकीय दृष्टया पूर्णपणे तंदुरुस्त असावा. (नोंदणीकृत वैद्यकीय अधिका—याकडुन वैद्यकीय तंदुरुस्ती प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य)

६. प्राधान्य : विधी महाविद्यालयातील विद्यार्थी, मास्टर ऑफ सोशल वर्क महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक, अंगणवाडी सेविका, कारागृहातील शिक्षाबंदी, सेवा निवृत्त शासकीय कर्मचारी, सेवानिवृत्त शिक्षक, वैद्यकीय चिकीत्सक, विधी सेवा विषयक कामकाजात भाग घेण्या—या गैर शासकीय संस्था सदस्य, महिला, तृतीयपंथी व्यक्ती, आदिवासी व्यक्ती, उपेक्षित घटकातीत नागरीक, उच्च उत्पन्न घटकातील व्यक्ती व इतर समितीला आवश्यक वाटणारे व्यक्ती.

निवड समिती अर्जाची छाननी करुन, मुलाखत / प्रशिक्षणानंतर अंतिम यादी तयार करेल.

यासाठी गरजु असलेले, सेवानिवृत्त शिक्षक, सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी, समाजसेवा पदवीत्तर पदवी महाविद्यालयातील (MSW) विद्यार्थी व प्राध्यापक, अंगणवाडी सेविका, कारागृहातील शिक्षाबंदी, वैद्यकीय चिकीत्सक, विधी महाविद्यालयातील विद्यार्थी, गैर शासकीय संस्था (NGO), महिला, तृतीयपंथी व्यक्ती, आदिवासी व्यक्ती, उपेक्षित घटकातील नागरीक, उच्च उत्पन्न गटातील होतकरु, समर्पित व कार्यक्षम व्यक्ती यांचेपैकी इच्छुकांनी आपल्या महाविद्यालय/संस्थेमार्फत व वैयक्तीक सोबत दिलेल्या नमुन्यातील अर्ज **दिनांक २४/०७/२०२६** पावेतो जिल्हा विधी सेवा प्राधिकरण कार्यालय, नाशिक येथे स्वत: अर्जदाराने सादर करावा. उशिरा आलेला किंवा अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण
नाशिक

(सतीश बा. हिवाळे)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, तथा सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,
नाशिक.

सोबत : नमुना अर्ज

प्रतिप्रत : माननीय सर्व अध्यक्ष, तालुका विधी सेवा समिती, जिल्हा नाशिक

Jahirat.odt

District Legal Services Authority, Nashik.

PLV Application Form

(for the year 2026-27)

1. **Full Name of Applicant (in block letter)** : ....
   (First Name) (Fathers Name) (Surname Name)
2. **Date of Birth** : / /
3. **Age (as on 30.06.2026)** : .... Yrs.
4. **Mobile No.** : ....
5. **E-mail ID** : ....
6. **Detail Address** : ....
   ....
   ....
7. **Educational Qualification** : ....
   ....
   ....
8. **Name of College** : ....
9. **Extra carriculam Activity** : ....
   ....
   ....
   ....
10. **Ready to work (tick number)** : 1. Police Station
    2. Front Office.
    3. Jail / Observations Homes.
    4. JJB / Child Welfare Centers.
    5. Other Legal Services. ....

11.	**Whether any Civil / Criminal case is pending against Applicant**	: Yes / No.
12.	**Whether applicant is previously convict ?**	: Yes / No.
13.	**Whether applicant is doing full time Job or Service / Profession ?**	: Yes / No.
14.	**Why applicant want to enrole as PLV ?**	: ....

....

....

....

....

....

I hereby declare that the above perticulars are true, correct & complete to the best of my knowledge & belief.

Date : / /2026

(Name & Sign)